# लोकपत्रकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर

**रामभाऊ धोंडिराम कांबळे** संशोधक विद्यार्थी (पीएच. डी.) पीपल्स कॉलेज संशोधन केंद्र, नांदेड
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड भ्रमनध्वनी : ९४०३५२००४७

---

ब्रिटीश राजवटीच्या अंमलाखाली असलेल्या तत्त्कालीन आधुनिक भारतातील साधारणत: सर्वच राष्ट्रीय नेत्यांनी तसेच समाजसुधारकांनी आपल्या स्वत:च्या विचाराभिव्यक्तीसाठी तसेच संघटना, चळवळीच्या ध्येय - धोरणांचा प्रचार - प्रसार करण्यासाठी, सामाजिक, राजकीय, धार्मिक अन्यायाविरूद्ध लोकजागृती व लोकसंघटन करण्यासाठी 'वृत्तपत्र' ह्या साधनाचा पुरेपूर उपयोग केल्याचे दिसते. राजा राममोहन रॉय – 'संवाद कौमुदी'. बाळशास्त्री जांभेकर – 'दर्पन' , 'दिग्दर्शन'. महादेव गोविंद रानडे – 'इंदूप्रकाश'. कृष्णाराव भालेकर – 'दिनबंधू'. लोकमान्य टिळक – 'केसरी', 'मराठा' . गोपाळ गणेश आगरकर – 'सुधारक'. महात्मा गांधी – 'इंडियन ओपिनियन', 'यंग इंडिया', 'हरिजन', 'नवजीवन समाचार'. मौलाना आझाद- 'अलहिलाल'. फिरोजशहा मेहता- 'बॉम्बे क्रॉनिकल'. अरविंद घोष – 'वंदे मातरम'. पंडित नेहरू- 'नॅशनल हेरॉल्ड'. डॉ. राजेंद्र प्रसाद – 'सर्च लाईट'. लाला लजपतराय- 'द पीपल'. इ. वृत्तपत्रे ह्या मान्यवरांनी चालविली असल्याचे सर्वज्ञात आहे. या वरील परंपरेमध्ये डॉ. भीमराव रामजी आंबेडकर यांचे नावही अग्रक्रमाने घ्यावे लागते. त्यांनीही अनुक्रमे 'मूकनायक', 'बहिष्कृत भारत', 'समता', 'जनता', 'प्रबुद्ध भारत' अशी एकंदर पाच वृत्तपत्रे चालविली व या पत्रकारितेच्या माध्यमातून सर्वहारा अशा सात कोटी अस्पृश्य लोकांच्या मनात स्व:अस्मिता जागृत केली. याचा शोध प्रस्तुतच्या लेखात घ्यावयाचा आहे.

**लोकजागृती :**

हिंदू समाजातील अस्पृश्य गणल्या गेलेल्या महार जातीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वत: जन्माला आल्यामुळे त्यांना बालपणापासूनच अस्पृतेच्या झळा सहन कराव्या लागल्या होत्या. त्यामुळे या अक्राळ-विक्राळ समस्येचे मर्म त्यांनीअचूकपणे ओळखले होते. विलायतेहून उच्च शिक्षण घेऊन भारतात परल्यानंतर त्यांनी 'अस्पृश्यता नष्ट करणे' हे आपले आद्यकर्तव्य समजून या कार्याला सुरूवात केली. खरं म्हणजे डॉ. आबेडकरांच्या नेतृत्त्वाचा उदय हा अत्यंत निर्णायक टप्प्यावर झालेला आहे. ही फारच जमेची बाजू ठरली असे दिसते. कारण १९१७ साली ब्रिटिशांनी क्रमिक स्वातंत्र्याची घोषणा केली होती. इंग्रजांकडून भारतीयांकडे सत्तांतर होत असताना दलितांना त्यात सहभागी करणे हा डॉ. आंबेडकरांनी आपल्या चळवळीचा हेतू तय केला होता. १९१९ साली भारतीयांना विशेष राजकीय हक्क बहाल करण्यासाठी साऊथब्युरो कमीटीने ३६ भारताीय लोकांच्या साक्षी घेतल्या. त्यापैकी डॉ. आंबेडकर एक होते. ज्या अस्पृश्यांना कधी साधे नागरिकत्त्वाचे अधिकार मिळाले नव्हते त्यांना विशेष राजकीय अधिकार प्रदान करण्याची मागणी त्यांनी या समितीसमोर केली. अस्पृश्यांच्या या राजकीय हक्कांच्या मागणीला लोकाधार मिळविण्यासाठी त्यांनी ३१ जानेवारी १९२० रोजी 'मूकनायक' हे पाक्षिक सुरू केले. या मागील हेतू स्पष्ट करताना ते लिहितात, ***"आमच्या या बहिष्कृत लोकांवर होत असलेल्या व पुढे होणाऱ्या अन्यायावर उपाययोजना सुचविण्यास, तसेच त्यांची भावी उन्नती व तिचे मार्ग यांच्या खऱ्या स्वरूपाची चर्चा होण्यास वर्तमानपत्रासारखी अन्य भूमीच नाही."*** [१] यावरून त्यांना वर्तमानपत्राची किती जरुरी वाटत होती ते लक्षात येते. याच अंकामध्ये त्यांनी भारतीय समजातील जातीय विषमतकडेही बारकाव्याने लक्ष वेधले आहे. 'मूकनायक' चालविण्यासाठी डॉ. आंबेडकर यांना शाहू महाराजांनी उदारपणे अडीच हजार रूपयांचा धनादेश देऊन अर्थसहाय्य केले. यासाठी दत्तोबा पवार यांनी मध्यस्थी केली होती. ज्या काळामध्ये डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्यता सुधारणेच्या कार्याला सुरुवात केली होती तो काळ अस्पृश्यांच्या दृष्टीने सर्वांगीनरित्या अभावग्रस्त होता. तत्त्कालीन अस्पृश्यांच्या स्थितीचे विदारक चित्रण १९२० (जूलै ) ला शाहू महाराज यांनी डॉ. आंबेडकर यांना पाठविलेल्या पत्रात पहावयास मिळते. ते असे, ***"... आजकाल सर्व अस्पृश्यलोकांचा 'स्पीरीट' नाहीसा झाला आहे त्यातल्या त्यात विशेषत: महार लोकांचा ! सेल्फरिस्पेक्टचा त्यांना स्पर्शदेखील नाही. आपण मनुष्य आहो किंवा पशूहून नीच आहो, याची कल्पना एक फर्लांग अंतरावरून त्यांच्याभोवती फिरते; परंतु त्यांना स्पर्शदेखील करत नाही. मग त्यांच्या मनात कोठून येणार ?"*** [२] यावरून अस्पृश्य लोकांचे जीवनमान किती रसातळाला गेले याची सहजच आपल्याला कल्पना येते. अशा या बिकट परिस्थितीत डॉ. आबेडकर मूकनायकच्या माध्यमातून दलित समाजामध्ये स्व:त्त्व जागृत करत होते . त्यांच्या मृतवत झालेल्या मनात नवचैतन्य ओतत होते. पण हे फार काळ चालले नाही. ते मूकनायकची जबादारी रा.रा. ज्ञानदेव ध्रुवनाथ घोलप यांच्यावर सोपवून उर्वरित अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी इंग्लडला निघून गेले. पुढे ते वर्तमानपत्र फार काळ चालू शकले नाही. अल्पावधीतच त्याची इतश्री झाली.

१९३० साली इंग्रज सरकार हिंदुस्थानच्या कायद्याची दुरूस्ती करून हाती राखून ठेवलेली सत्ता हिंदी लोकांच्या हाती देईल असा डॉ. आंबेडकरांना अंदाज वाटत होता. नि:पक्षपाती ब्रिटीश सरकारडूनच आपल्याला राजकीय हक्क मिळतील ते आपल्या समाजातील प्रस्थापित वरीष्ठांकडून मिळणार नाहीत असे त्यांना वाटत होते. म्हणून त्यांनी अस्पृश्य समाजाच्या न्याय हक्कांसाठी आत्ताच चळवळ सुरू करण्याच्या निर्णय घेतला. यासाठी ०३ एप्रिल १९२७ रोजी 'बहिष्कृत भारत' हे वृत्तपत्र काढून त्यात 'पुनश्च हरि ॐ' हा अग्रलेख लिहिला. यावरून त्यांची ही भूमिका स्पष्ट होते. शिवाय त्यांनी यापूर्वीच महाड सत्याग्रहाची तयारी सुरू केली होती. १९ व २० मार्च १९२७ महाड मुक्कामी कुलाबा बहिष्कृत परिषद बोलावण्यात आली होती. तिच्या अध्यक्षपदावरून त्यांनी महत्त्वपूर्ण भाषण केले होते. ही परिषद संपल्यानंतर सर्वांनी चवदार तळ्यावर जाऊन पाणी प्राशन केले. हिंदू धर्मातील सनातनी प्रवृत्तीच्या लोकांनी अस्पृश्यांना तिथे पाणी भरण्याचा हक्क नाकारला होता. त्यामुळे तिथे अस्पृश्य लोक विरेश्वराच्या देवळात घुसले अशी खोटी अफवा पसरवून अस्पृश्य लोकांना बेदम मारहाण करण्यात आली. यासंदर्भात 'भाला'कार भोपटकार म्हणाले की, देवळात शिरण्याचा अविचार केल्यास अस्पृश्यांच्या पाठी सडकल्या जाण्याचा संभव आहे. याला प्रतिउत्तर देताना आंबेडकर म्हणाले, ***"आमच्या पाठी सडकण्याची धमकी देणाऱ्यांची प्रसंग पडल्यास टाळकी शेकण्यास आह्मी पर्वा करणार नाहीं. मग काय होणार असेल ते होवो."***[3] यावरून आंबेडकर अस्पृश्य सुधारणेसाठी किती संघर्षशील वृत्तीने काम करत होते याची अंदाज येतो. अस्पृश्यांच्या सुधारणाचळवळीची माहिती जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी, त्यांना त्यांच्या न्याय हक्कांची जाणीव करून देण्यासाठी बहिष्कृत भारत या वृत्तपत्राची सुरूवात त्यांनी केली होती. यातून त्यांनी अत्यंत विचारप्रवर्तक व क्रांतिकरी लेखन केले आहे. महाड सत्याग्रहाबाबतीत, 'महाड येथील धर्मसंगर व वरिष्ठ हिंदूची जबाबदारी', 'महाड येथील धर्मसंगर व इंग्रज सरकारची जबाबदारी', 'महाड येथील धर्मसंगर व अस्पृश्य वर्गाचें कर्तव्य' हे अत्यंत प्रगल्भ चिंतनगर्भ अग्रलेख लिहिले. विचारशून्य लोकास विचार करावयास भाग पाडले. त्यांनी आपल्या समाजबांधवांना अस्पृश्यतेच्या विरोधात प्रतिकारयोग, बहिष्कारयोग अंगिकारून संघर्षसिद्ध व्हावयास निक्षून सांगितले. अस्पृश्य समाजातील महार लोकांना गुलामीत डांबणाऱ्या महार वतनाच्या अनुषंगानेही त्यांनी 'महार आणि त्यांचे वतन' व इतर शिर्षकाखाली काही अग्रलेख लिहिले. त्यांनी महार लोकांना स्पष्टपणे बजावले की, ***"वतनामुळे महारांतील महत्त्वकांक्षा साफ मारली गेली आहे."***[4] यामुळे त्यांनी महार वतन खालसा करावे असे स्पष्ट सांगितले.

**हिंदू धर्म सुधारक :**

हिंदू धर्मातील समाजविघातक रूढी प्रथांविरूद्धही आंबेडकरांनी बहिष्कृत भारतमधून निखराचे हल्ले चढवले व कठोर चिकित्सा केली. हिंदू धर्मातील भेटीबंदी किंवा लोटीबंदी गेली म्हणून अस्पृश्यता संपणार नाही तर त्यासाठी बेटीबंदीचा बांध फोडल्याशिवाय गत्यंतर नाही. हे त्यांनी रोखठोकपणे सांगितले. समतेचा पुरस्कार करताना ते लिहितात, " ***हिंदू समाज समर्थ करावयाचा असेल तर चातुर्वर्ण व असमानता यांचे उच्चाटन करून हिंदू समाजाची रचना एकवर्णत्व व समता या दोन तत्त्वांच्या पायावर झाली पाहिजे. अस्पृश्यता निवारणाचा मार्ग हा हिंदू समाज समर्थ करण्याच्या मार्गापासून भिन्न नाही."***[5] अशा प्रकारे ते हिंदू धर्म सुधारणेसाठी क्रांतिकारी विचार निर्भयपणे मांडत होते. पण इथल्या जातीयग्रस्त मानतिकतेच्या लोकांनी हिंदू धर्माचे विरोधक समजून त्यांच्यावर टिका केली. ***"बहिष्कृत भारताच्या झंझावातने महाराष्ट्रातील हिंदू समाजात एकप्रकारचे तुफाण आले आहे."***[6] आंबेडकरांचे हे विधान बहिष्कृत भारतातील लेखन वाचल्यास सत्य वाटते. 'आजकालचे प्रश्न' या सदरामधूनही त्यांनी अनेक तत्त्कालीन प्रश्नावर लेखन केले. या वृत्तपत्रातील लेखन काही अपवाद सोडता संपूर्णपणे स्वत: डॉ. आंबेडकरांनी केलेले आहे. हे त्यांचे लेखन म्हणजे क्रांतीस्त्रोत आहे. तसेच ते अस्पृश्य सुधारणेच्या चळवळीची साक्ष देणारा ऐतिहासिक दस्ताऐवज आहे. यासाठी त्यांनी अथक पहिश्रम घेतले. डोळ्याच्या वाती केल्या. खुप झीज सोसली. बहिष्कृत भारतमधील लेखनाच्या माध्यमातून समग्र अस्पृश्य वर्गाला जागृत व जिवंत करू इच्छितात. प्रस्थापित वर्गातील विचारशून्य लोकास विचारप्रवृत्त करणे हा या लेखनाचा अनुषंगिक उद्देश आहे. पण या लेखनाचा मध्यवर्ती उद्देश दलित वर्गाला नवी अस्मिता प्राप्त करून देणे हाच होय. १५/११/१९२९ ला २१,२२ वा अंक एकत्रित प्रकाशित झाला आणि हे वृत्तपत्र बंद पडले. डॉ. आंबेडरांच्या मागे सामाजिक कार्याचा खुप व्याप वाढल्याने ते पुढे चालवणे त्यांना अश्यक्य झाले होते. याच काळात २९ जून १९२८ ते १५ मार्च१९२९ 'समता' नावाचे पाक्षिकही चालविले होते. त्यातूनही समाजप्रबोधनपर विविध विषयावर लेखन केले.

**जनतेचा उदय :**

बहिष्कृत भारत हे वृत्तपत्र बंद पडल्या नंतर डॉ. आंबेडकरांना दुसऱ्या एका वृत्तपत्राची गरज भासू लागली. कारण आता अस्पृश्यता निवारणाच्या चळीवळीने जोम धरला होता. महाड सत्याग्रह, मनुस्मृती दहन अशा कृतीशील घटनांनी समाजमन ढवळून निघत होते. अशा वेळी या चळवळीची गती कमी होणे हे परवडणारे नव्हते. म्हणून डॉ. आंबेडकरांनी २४ नोव्हेंबर १९३० रोजी 'जनता' हे वृत्तपत्र देवराव विष्णू नाईक यांच्या संपादकत्वाखाली सुरू केले. ते पुढे २८ जानेवारी १९५६ पर्यंत प्रदीर्घ काळ सुरू राहिले. हे वृत्तपत्र चालावे म्हणून डॉ. आंबेडकर खुप काळजी घेत होते ते भाऊराव गायकवाड यांना एका पत्रात लिहितात, ***" जनता पत्रासाठी लिखाण करण्याकरिता मी माझी शक्ती अेकवटायचे ठरविले आहे."***[७] या बोलण्यानुसार त्यांनी लिखाणही केले. गोलमेज परिषदेसाठी ते इंग्लडमध्ये असताना तेथूनही 'जनते'साठी पत्रे लिहत होते. त्यातून तेथील घडामोडी कळवत होते. जनतामधूनच काळाराम मंदिर सत्याग्रहा संबंधी बातम्या प्रसिद्ध होत असत. त्यामुळे हे वृत्तपत्र चालू राहावे यासाठी आणखी एका पत्रात ते लिहितात, ***"जनतेच्या आश्रयदात्यांस मला अेवढीच गोष्ट सांगावयाची आहे की कोणत्याही चळवळीच्या यशाचे चिन्ह म्हटले म्हणजे वर्तमानपत्र असते. आपल्या स्वावलंबनाच्या भावी राजकीय हक्कांच्या लढ्यासाठी वर्तमानपत्र भरभराटीस आनले पाहिजे. जनता पत्राची आज तुम्हास किंमत वाटत नसली तरी त्याची खरी जाणीव होण्याचा काळ लवकरच प्राप्त होणार आहे. तरी मी परत येईपर्यंत जनता पत्राचे वर्गणीदार आजच्यापेक्षा दुप्पटीने वाढले पाहिजेत."***[८] अशा रितीने त्यांनी आपल्या लोकांना जनता पत्राला आश्रय देण्याची साद घातली. या पत्रामधूनच त्यांनी गुलामांना त्यांच्या गुलामीची जाणीव करून दिली. अस्पृश्यांच्या भाग्योदयाला हे पत्रही कारण ठरले यात शंका नाही.

जनता पत्राचे ०४ फेब्रुवारी १९५६ ला 'प्रबुद्ध भारत' असे नामकरण करण्यात आले. डॉ. आंबेडकर हयात असताना त्याचे ३९ अंक प्रकाशित झाले होते. त्यामध्ये दि. १ डिसेंबर १९५६ रोजी 'महात्मा फुले विशेषांक' प्रकाशित झाला होता. प्रबुद्ध भारतचा 'धम्म दिक्षा विशेषांक'ही प्रकाशित झाला होता. बाबासाहेबांच्या निधनानंतरही चार-पाच वर्षे हे पत्र चालू होते . त्यामध्ये बाबासाहेबांविषयी बरीच दुर्मिळ व महत्त्वाची माहिती प्रसिद्ध झाली.

बाबासाहेबांचे वृत्तपत्रीय लेखन पाहता त्यांची पत्रकारिता सामाजिक बांधिलकीच्या तत्त्वाने प्रेरित झालेली दिसते. दलित वर्गामध्ये त्यांना सामाजिक जागृती करायची होतीच पण त्याचबरोबर त्यांना राजकीय जागृती देखील करायची होती. या सर्वंकश जागृतीचे प्रत्यंतर त्यांच्या लेखनातून साकार होते. हे करत असताना हजारो वर्ष मृतवत पडलेल्या अस्पृश्य लोकांच्या मनामध्ये त्यांनी जी आद्य अस्मिता जागृत केली ती अनुपम आहे.

संदर्भ यादी

१ ) 'मूकनायक' अंक पहिला ३१ जानेवारी १९२० पृ. क्र. ३

२) राजर्षी शाहू छत्रपती : पत्रव्यवहार आणि कायदे डॉ. जयसिग पवार सुमेरू प्रकाशन, डोंबिवली प्र.आ. २००७ पृ. क्र .४६

३) बहिष्कृत भारत १३ एप्रिल १९२७ अंक १ला पृ.क्र. ३

४) बहिष्कृत भारत १६ सप्टेंबर १९२७ अंक १२ला पृ.क्र. ५

५) बहिष्कृत भारत पुरवणी २५ डिसेंबर १९२७ पृ.क्र. ५

६) बहिष्कृत भारत ०३ फेब्रुवारी १९२८ अंक २२,२३,२४ पृ.क्र. १२

७) विलायतेहून डॉ. बाबासाहेबांची पत्रे संकलक रत्नाकर गणवीर नेहा प्रकाशन, नागपूर आ. चौथी २०१२ पृ.क्र.५६

८) तत्रैव पृ.क्र.११५,११६